सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-०००१७०-२०१६

नियमित दिवाणी दावा क्र. ५६/२०१६

निशाणी क्र. ९१ व ९४ वरील आदेश

प्रस्ततुचा अर्ज वादी याने प्रतिवादी क्र. ४ चे वारस रेकॉर्ड घेवून तशी दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीने आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, दाव्यातील प्रतिवादी क्र.४ सत्यवती लवू पाटकर पुर्वाश्रमीची सत्यवती गणपत तेली उर्फ कुवळेकर ही दि.१३/१०/२०२३ रोजी मयत झाली आहे. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र.४ चे वारस दाव्यात सामील करुन त्याप्रमाणे दाव्याची दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेची विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जातील कारण हे संयुक्तिक नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादीने केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, वादीने निशाणी क्र.९३ च्या यादी सोबत मयत प्रतिवादी क्र.४ चा मृत्यूचा दाखला हजर केला आहे. सदरच्या मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.४ सत्यवती लवू पाटकर या दि.१३/१०/२०२३ येथे मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज वादीने उशिराने दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे कामी सदरची दुरुस्ती महत्त्वाची आहे. सदर दाव्यास प्रतिवादी क्र.४ चे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. सबब, न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत अर्ज मंजूर करुन मयत प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**- आदेश -**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीस प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब वादीने प्रतिवादींना रक्कम रुपये ३००/– देण्याच्या अटीवर माफ करणेत येत आहे.

३. वादीने प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर घेवून तशी त्वरीत दुरुस्ती करावी व दाव्याची दुरुस्ती प्रत दाखल करणेची आहे.

NANDA BAPUSO GHATAGE

Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2024.07.24 16:54:15 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )

दिनांकः २२/०७/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.